# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर -४१६ ००४.

**Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur-416 004**

**Phones: Chairman** 2690829 [O] 2656044 [R]
**PBX** – [0231] 2696101, 2696102, 2696103
**E-Mail:** divsec.kop@gmail.com

**Secrtary** 2691405[O]
**FAX:** [0231] 2690758
**Website :** sscboardkolhapur.in


**गोपनीय / तातडीचे**

क्र.कोविमं/भांडार/शिल्लक स्टेशनरी/5963
कोल्हापूर,दिनांक १७/१२/२०२०

प्रति,

सर्व परिरक्षक
इ.१० वी व व इ.१२ वी परीक्षा नोव्हेंबर-डिसेंबर २०२०
जिल्हा सातारा, सांगली व कोल्हापूर.

विषय :- परीक्षा केंद्रावरील शिल्लक स्टेशनरी व परिरक्षक केंद्रावरील गोपनीय साहित्याच्या रिकाम्या पेट्या संकलनाबाबत...

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, नोव्हेंबर-डिसेंबर २०२० मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेच्या आपल्या अखात्यारित येणा-या परीक्षा केंद्रानी जमा केलेली शिल्लक स्टेशनरी (उत्तरपत्रिका, पुरवणी, नकाशा पुरवणी, आलेख पुरवणी व होलोक्राफ्ट स्टिकर इ.) व गोपनीय साहित्याच्या रिकाम्या ट्रंका मंडळ कार्यालयाकडे कार्यालयीन वाहनाव्दारे संकलीत करावयाच्या आहेत.

तरी आपल्या परिरक्षक केंद्रावर जमा झालेल्या उत्तरपत्रिका, पुरवणी, नकाशा पुरवणी, आलेख पुरवणी व होलोक्राफ्ट स्टिकर इ. वेगवेगळी करुन गठ्ठे बांधून तयार ठेवावी. ज्या परीक्षा केंद्रांनी अद्याप आपणाकडे साहित्य जमा केलेले नाही अशा केंद्र संचालकांशी त्वरीत संपर्क साधून साहित्य जमा करणे विषयी कळविण्यात यावे.

**सदर स्टेशनरी व ट्रंका ताब्यात घेण्यासाठी मंडळ प्रतिनिधी वाहनासह पाठविण्यात येणार असून त्याबाबतचा तपशील (गाडी येण्याचा दिनांक व रुट ) आपल्याला दुरध्वनीव्दारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.** तरी नियोजित दिनांकास आपल्या परिरक्षक केंद्रावर जबाबदार प्रतिनिधी उपस्थित ठेवावा. सदर साहित्य नियोजित कालावधीत मंडळाच्या वाहनामध्ये जमा करण्याची जबाबदारी आपली राहिल. तसेच आपल्या परिरक्षक केंद्रावर उपरोक्त पैकी कोणतीही स्टेशनरी शिल्लक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण
मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर.

**प्रत माहितीसाठी तथा पुढील आवश्यक त्या कार्यवाही साठी**

**१.सर्व परिरक्षक केंद्रशाळा /क.महाविद्यालय,** सातारा/सांगली/कोल्हापूर यांना कळविण्यात येते की, नियोजित दिनांकास केंद्रावर आपला प्रतिनिधी उपस्थित राहील याची दक्षता घ्यावी.
अ.रिकाम्या ट्रंकाची यादी (वेगळी करणे) **ब.** शिल्लक स्टेशनरी साहित्य यादी वेगळी करणे.

**२.सर्व केंद्रसंचालक :-**आपण आपल्याकडील शिल्लक स्टेशनरी परिरक्षक केंद्रावर त्वरीत जमा करावी, तसेच आपल्या परीक्षा केंद्रावर कोणतेही साहित्य शिल्लक नसलेबाबत प्रमाणपत्र आपल्या संबंधित परिरक्षकाकडे सादर करावयाचे आहे, यांची नोंद घ्यावी. **जर आपण आपल्याकडील शिल्लक स्टेशनरी परिरक्षक केंद्रावर जमा केली नाही तर आपणास स्वखर्चाने मंडळ कार्यालयात दिनांक ३१/०१/२०२१ पर्यंत सदर साहित्य जमा करावे लागेल.**